admn21-22


# महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन परिषद,

(महाराष्ट्र कृषी विद्यापीठ अधिनियम, १९८३ मधील कलम १२ नुसार स्थापित)

**१३२/ब, भांबुर्डा, भोसलेनगर, पुणे - ४११ ००७.**

MCAER
कृषि परिषद

**ई-मेल : edn_mcaer@rediffmail.com** **संकेतस्थळ : www.mcaer.org** **दूरध्वनी (०२०) २५५२८६८८**


जा.क्र. मकृप/शिक्षण-१/१३२१/२४९४ दि. ०९ डिसेंबर,२०२१

## परिपत्रक

**विषयः- पदवी प्रवेश प्रक्रिया २०२१-२२**
**विद्यार्थ्यांचे शैक्षणिक शुल्क व मूळ कागदपत्रे प्राप्त करून घेण्याविषयीच्या कार्यपध्दतीबाबत.**

राज्यातील चारही कृषी विद्यापीठांतर्गत पदवी अभ्यासक्रमाची सन २०२१-२२ या शैक्षणिक वर्षातील प्रवेश प्रक्रिया राज्य सामायिक प्रवेश परीक्षा कक्षामार्फत चालू आहे. नियोजित वेळापत्रकानुसार सदर पदवी प्रवेश प्रक्रियेंतर्गत तीन ऑनलाईन प्रवेश फेऱ्या राबविण्यात येणार आहे. या ऑनलाईन प्रवेश फेऱ्यांद्वारे प्रवेशाचे वाटप निश्चित केलेल्या (Freeze) विद्यार्थ्यांकडून दि. २० ते २२ डिसेंबर,२०२१ या कालावधीत मूळ कागदपत्रे व आवश्यक ते शुल्क प्राप्त करून त्याबाबतची पावती संबंधित विद्यार्थ्यास द्यावयाची आहे.

तथापि, या कार्यालयाच्या असे निदर्शनास आले आहे की, विद्यार्थ्याने त्याच्या लॉगइनद्वारे प्रवेश निश्चित केलेला (Freeze) नसतांना महाविद्यालये संबंधित विद्यार्थ्यांकडून मूळ कागदपत्रे आणि शुल्क घेत आहेत. तसेच यासंदर्भात विद्यार्थ्यांना Freeze विकल्पाबाबत माहिती देत नाहीत. त्यामुळे प्रवेश प्रक्रिया शुल्क रु.१०००/- राज्य सामायिक प्रवेश परीक्षा कक्षाकडे जमा होत नाही. सदरची बाब अत्यंत गंभीर असून या अनियमिततेमुळे मंजूर प्रवेश क्षमतेपेक्षा जादा जागांवर प्रवेश होण्याची दाट शक्यता आहे.

यास्तव सर्व महाविद्यालयांना या परिपत्रकाद्वारे सूचित करण्यात येते की, पदवी प्रवेश माहिती पुस्तिकेतील मुद्दा क्र. ४.१३ येथील 'प्रवेश वाटपाची कार्यपध्दती' आणि संकेतस्थळावरील सुधारीत वेळापत्रकामध्ये दिलेल्या सूचनांचे आकलन करावे व त्यानुसारच प्रक्रिया करावी.

(हरिहर कौसडीकर)
संचालक (शिक्षण)

प्रति,

कृषी विद्यापीठांतर्गत सर्व पदवी महाविद्यालयांचे सहयोगी अधिष्ठाता तथा प्राचार्य.

प्रतः-

(१) मे.एसएमबी सिस्टमस् प्रा.लि. विश्वकुटीर, शंकर घानेकर मार्ग, दादर (पश्चिम), मुंबई
यांना सूचित करण्यात येते की, सर्व महाविद्यालयांना अवगत होण्याच्या दृष्टिकोनातून सदर परिपत्रक आपल्या संकेतस्थळावर उपलब्ध करून द्यावे.

(२) मे. मिटू स्किलोजिस्, दुसरा मजला, रत्नतारा कॉम्लेक्स, क्रांती चौक, नवी सांगवी, पुणे ४११०४७
यांना सूचित करण्यात येते की, त्यांनी सदरचे परिपत्रक कृषी परिषदेच्या संकेतस्थळावर उपलब्ध करून द्यावे.

प्रत माहितीसाठीः- मा. आयुक्त, राज्य सामायिक प्रवेश परीक्षा कक्ष, ८ वा मजला, न्यु एक्सेसर बिल्डींग, ए. के. नायक मार्ग, फोर्ट, मुंबई ४००००१.